आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ६४ वा ● रविवार दि. २८ जुलै २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## राज ठाकरेंचा स्वबळाचा नारा; विधानसभेसाठी मनसेचा पहिला उमेदवार ठरला!

पुणे : पदाधिकारी मेळाव्यात बोलताना मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. मनसे विधानसभेच्या २२५ ते २५० जागा लढवणार असल्याचं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता मनसे विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवार निवडून आणणारच असं देखील राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. जो निवडून येईल त्यालाच तिकीट दिलं जाईल असंही राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना म्हटलं आहे. दरम्यान राज ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर आता मनसेच्या काही नेत्यांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्याचं चित्र आहे. मनसेचे पुणे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे. त्यामुळे वसंत मोरे यांनी मनसे सोडल्यानंतर आता हडपसरमधून मनसेचा नवा शिलेदार रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.

# शहरातील उड्डाण पुलाच्या संरक्षण भिंतीवर कार धडकल्याने चालक जागीच ठार तर चार जखमी

भोकर /सिद्धार्थ जाधव /नांदेड कडून भोकर मार्गे किनवट कडे भरधाव वेगात जाणारी इरटिका कार भोकर शहरातील उड्डाण पुलाच्या रक्षक भिंतीवर धडकल्याने कार चालकाचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवार दि .२६ रोजी रात्री ९ वाजताच्या दरम्यान घडली आहे.

कुटुंबातील सदस्यांना नांदेड येथील एका रुग्णालयात दाखवून घरी किनवटकडे जात असताना इरटीका कार क्र .एम एच १४ डी एन ६८४८ भोकर येथील उड्डाण पुलाच्या रक्षक भिंतीवर जोरात धडकल्याने कारचा समोरील भाग चेंदामेंदा होऊन कार चालक व शेजारी बसलेला प्रवासी दोघेही गंभीर जखमी झाले तर मागे बसलेले तीघे पण जखमी झाले या सर्वांना पत्रकार सुधांशु कांबळे आणि मनसेचे माधव मेकवाड यांनी नागरिकांच्या मदतीने कारच्या बाहेर काढून ग्रामिण रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले येथील डॉक्टरनी जखमीवर शर्थीचे प्रयत्न करत उपचार केले पण चालकाचा जास्तीचा रक्तस्त्राव झाल्याने चालक किशोर मालू कांबळे ४२ रा . दराटी ता . उमरखेड यांचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. जखमी प्रेम अदमसिंग मसे ४० बेबी प्रेम मसे ३७ दक्ष प्रेम मसे १५ अनिल नरसिंगराव नेमानीवार रा किनवट यांच्यावर प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी नांदेड येथील सरकारी दवाखान्यात पाठवण्यात आले आहे .

अपघाताची माहिती कळताच अपघात ठिकाणी जमादार दिपक कंधारे व त्यांचे पोलीस सहकारी यांनी पंचनामा केला केला असून पो. नि. सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल प्रक्रिया व पुढील तपासाची कार्यवाही चालू आहे.




**उडाण पुलावरील पथदिवे बंद असल्याने अपघात झाल्याची प्रत्यक्षदर्शनीकडून माहिती, शहरातील पथदिवे तात्काळ चालू करण्याची मागणी**

शहरातील उड्डाण पूलवरील पथदिवे बंद अवस्थेत असल्यामुळे भोकर कडून जात असलेल्या वाहणाच्या लाईट मुळे नांदेड कडून भोकर कडे येणाऱ्या सदरील अपघात झालेल्या वाहन चालकांस उड्डाण पुलाचे संरक्षण भिंत दिसली नसावी...? म्हणून हा अपघात झाला असल्याचे अपघात स्थळी असणारे प्रत्यक्षदर्शनीकडून सांगण्यात येत आहे. उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूने शहरात जाणारे रस्ते आहेत या ठिकाणी दिशा दर्शक फलक लावला नसल्याने वाहण चालकास उडाण पुलाच्या संरक्षण भिंतीचा अंदाजा आला नसावा....? परिणाही हा अपघात होण्यास कारण ठरले असावे....? उड्डाण पुलावरील संरक्षण भिंतीला दोन्ही बाजूने लावलेले पथदिवे ही माघील अनेक दिवापासून बंद अवस्थेत आहेत. हे पथदिवे चालू असते तर कदाचित हा अपघात टाळला असता आणि एका निष्पाप तरुणाचा बळी गेला नसता. यानिमित्ताने उड्डाण पुलावरील पथदिव्यांसह किनवट रोड, बोरगाव रोड, नांदेड रोड तसेच शहरातील मुख्यरस्त्यावरील गेल्या कनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेले दुभाजकामधील पथदिवे बसविण्यात यावे अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

## कवी संमेलन संपन्न

मुंबई – युवा क्रांती मंच ( रजि. ) ह्या



संस्थेच्या वतीने युवा क्रांती मंच चे उपाध्यक्ष नितीन गायकवाड यांच्या ३३ व्या वाढदिवसानिमित्त जेष्ठ साहित्यिक, समिक्षक सुभाष आढाव यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन संपन्न झाले.

सर्वप्रथम लुम्बिनी बाग येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला दैनिक ' सार्वभौम राष्ट्र ' चे प्रतिनिधी राजेंद्र झेंडे, नितीन गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कवी संमेलनास ॲड. प्रफुल्ल चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कवी संमेलनाचे सुत्रसंचालन विद्रोही आंबेडकरी कवी अनंत धनसरे यांनी व प्रास्ताविक बबन तुपेरे यांनी केले.

लुम्बिनी बाग , गोवंडी येथील सहयोग सेवा सोसायटीच्या सभागृहात संपन्न झालेल्या कवी संमेलनात वसंत हिरे, बापू चंदनशिवे, चरणदास सावंत , संदेश कर्डक , नामदेव साबळे , अशोक रणदिवे आदी कवींनी कविता सादर केल्या. सदरहू कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नितीन गायकवाड यांनी केले. सदरहू कार्यक्रमास अक्षय साळवे, विनोद केदारे ,ॲड. अविनाश साळवे, ॲड. मयूर आढाव, हंसा आढाव, ममता आढाव, प्रदीप अंभोरे, संदीप कांबळे आदी उपस्थित होते.

## बेलापूर इमारत दुर्घटनेतील आपदग्रस्तांना आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करावी – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नवी मुंबई मनपा आयुक्तांना सूचना

मुंबई, : शहाबाज गाव, सेक्टर १९,



बेलापूर येथे एक इमारत कोसळून आज पहाटे झालेल्या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकाळी नवी मुंबई महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करून माहिती घेतली. इमारत दुर्घटनेत सापडलेल्या आपत्तीग्रस्तांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी महापालिका आयुक्तांना दिली.

मुख्यमंत्री श्री. शिंदे हे निती आयोगाच्या बैठकीसाठी सध्या दिल्ली येथे आहेत. बैठकीला जाण्यापूर्वी तेथूनच त्यांनी मनपा आयुक्त श्री. कैलास शिंदे यांच्याशी फोनद्वारे चर्चा करून इमारत दुर्घटनेसंदर्भात माहिती घेतली.

इमारत दुर्घटनेनंतर प्रशासनामार्फत तातडीने बचावकार्य सुरु करण्यात आले आहे. या सर्व आपत्तीग्रस्तांना तातडीचे उपचार, आरोग्य सुविधा, अन्नपाणी, कपडे, तात्पुरता निवारा आदी आवश्यक सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात. महापालिका आणि इतर सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी या आपत्तीग्रस्तांना आवश्यक ते सहाय्य तातडीने उपलब्ध करावे, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.




# नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व पाण्याची बचत करण्याची आवश्यकता – सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर

दयानंद विज्ञान महाविद्यालयात पाणी बचत अभियानांतर्गत जिल्हास्तरीय प्राचार्यांची कार्यशाळा

लातूर : नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व पाण्याची बचत व्हावी म्हणून महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन युवकांमध्ये पाणी बचत हे अभियान राबविण्यात येत आहे.महाविद्यालयीन युवक-युवतींनी समाजजीवनात सक्रिय राहून पाणी बचतीसंदर्भात जनजागृती केली पाहिजे.जर पाण्याची योग्य बचत केली तरच उद्याचे भविष्य उज्ज्वल असणार आहे. म्हणूनच या अभियानामध्ये जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी महाविद्यालयीन प्राचार्यांनी प्रोत्साहित करावे. पाणी बचत या अभियानात महाराष्ट्रातील १३ जिल्हांची निवड केलेली आहे.त्यात लातूर जिल्ह्याचा समावेश आहे.म्हणूनच महाविद्यालयामध्ये ग्रीन क्लबची स्थापना करून त्याद्वारे पाणी बचतीचे विविध उपक्रम घेण्यात यावेत.महाविद्यालयीन तरूणाईंनी धएथड व थक्ध थ-ड्ढए 'तरुणांच्या सहभागाने जल अभियान ' हे प आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून त्याद्वारे पाणी बचतीच्या ज्या चांगल्या सवयी आहेत त्या दररोज पमध्ये नोंदवून आपण किती पाणी बचत केली हे



त्यांच्या लक्षात येईल,अशा प्रकारे त्यांच्यामध्ये चांगल्या सवयी रुजतील व पाण्याचीही बचत होईल,असे प्रतिपादन उच्च शिक्षण नांदेड विभागाचे सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर यांनी केले.

लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२३ जुलै २०२४ रोजी पाणी बचत अभियानांतर्गत जिल्हास्तरीय प्राचार्यांच्या कार्यशाळेचे,बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून युनिसेफ प्रतिनिधी राहुल गिरी,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,जिल्हा नोडल अधिकारी डॉ.महेश करळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे राहुल गिरी यांनीही महाविद्यालयातील युवक-युवतींनी पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे,शैक्षणिक संस्था स्तरावर ग्रीन क्लब स्थापन करणे,पर्यावरण व हवामान बदल याविषयी माहिती वृद्धिंगत करणे व कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षण घेणे याविषयीचे सखोल असे मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक जिल्हा नोडल अधिकारी डॉ.महेश करळे यांनी केले तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेलाळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.अनुराधा इंगळे यांनी केले.या कार्यशाळेसाठी लातूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले.

## भूकंपग्रस्तांचे आरक्षण वाढवून ३ टक्के करा... उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्याकडे आ अभिमन्यू पवारांची मागणी..

औसा – १९९३ च्या भूकंपानंतर लातूर व धाराशिव



जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांना ३ टक्के आरक्षण दिले होते.यामध्ये तत्कालीन काँग्रेस सरकारने हे आरक्षण कमी करून २ टक्के केले यानंतर २०१५ ला न्यायालयीन निर्णयाचा हवाला देत भूकंपग्रस्त आरक्षणात कोयना भूकंपग्रस्तांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे भूकंपग्रस्तांसाठी देण्यात येत असलेले २ टक्के आरक्षण कमी असून भूकंपग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने हे आरक्षण वाढवून ३ टक्के इतके करावे अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे (दि.२६) जुलै रोजी केली आहे. याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मदत व पुनर्वसन सचिवांना दिल्या आहेत.

१९९३ च्या महाप्रलयकारी किल्लारी भूकंपात किल्लारी व आजूबाजूच्या गावांमधील जवळपास १० हजार नागरिकांचा मृत्यू झाला होता तर हजारो जनावरे दगावली होती आणि हजारो घरं ध्वस्त झालेली. त्या महाप्रलयकारी भूकंपाच्या वेदना मनावर घेऊनच लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील हजारो कुटुंबे जीवन व्यतीत करतात. तत्कालीन सरकारने किल्लारी भूकंपग्रस्तांना ३ टक्के आरक्षण दिले होते पण २००९ साली तत्कालीन काँग्रेस सरकारने त्यात घट करून भूकंपग्रस्तांसाठी २ टक्के आरक्षण केले. त्यात २०१५ साली न्यायालयीन निर्णयाचा हवाला देऊन भूकंपग्रस्त आरक्षणात कोयना भूकंपग्रस्तांचा समावेश करण्यात आला. या दोन्ही बाबींचा विचार करून भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण वाढवून ३ टक्के इतके करण्यात यावे अशी मागणी आ अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली.

विविध शासकीय नोकरभरतीतील भूकंपग्रस्तांची रिक्त पदे इतर प्रवर्गातून भरण्याची मुभा देणारा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने नोव्हेंबर २०१६ मध्ये घेतला, यामुळे 'पात्र उमेदवार मिळाले नाहीत' अशी कारणे पुढे करून भूकंपग्रस्तांच्या आरक्षणावर सर्रासपणे अतिक्रमण केले जात असून सामान्य प्रशासन विभागाचा सदरील शासन निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी आ अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असता तपासून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना दिल्या आहेत. शिक्षण सेवक भरतीतील भूकंपग्रस्त प्रवर्गातील रिक्त पदे भूकंपग्रस्त आरक्षणातच कायम ठेवत पात्र भूकंपग्रस्त डिएड /बीएड धारकांना सेवेत सामावून घेऊन सेवांतर्गत पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ३ अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात या आ अभिमन्यू पवार यांच्या मागणीसंदर्भात सुद्धा तपासून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शालेय शिक्षण विभागाला दिल्या आहेत.यावेळी सोबत भूकंपग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष अमर बिराजदार, अभिलाष फावडे, व्यंकट जगताप, विष्णू काकडे उपस्थित होते...

# पूरग्रस्त भागात आवश्यकता पडल्यास जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देणार – पालकमंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर, (जिमाका) : पावसाचा जोर कमी झालेला आहे मात्र अजूनही पाणी पातळीत थोडी थोडी वाढ होत आहे. फक्त धरण क्षेत्रामध्ये पाऊस पडत असून पुराचा धोका टळलेला नाही. म्हणून प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार नागरिकांनी स्थलांतर करुन सहकार्य करावे, असे आवाहन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. आंबेवाडी येथील पुरभागात भेट दिल्यानंतर शिरोळ तालुक्यातील कुरुंदवाड, नृसिंहवाडी तसेच इचलकरंजी या पुरग्रस्त भागाची पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पाहणी केली. पाहणी दरम्यान कुरुंदवाड, नृसिंहवाडी या भागातील सुमारे ५० कुटुंबियांचे स्थलांतर झालेल्या निवारागृहात जावून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी पुरग्रस्त भागात आवश्यकता पडल्यास जिल्हा वार्षिक योजनेतील निधीमधूनही मदत करु असे आश्र्वासन हसन मुश्रीफ यांनी दिले.

निवारागृहात स्थलांतरीत करण्यात आलेल्या कुटुंबियांची योग्य ती काळजी घेतली जात असून आवश्यक त्या सर्व सुविधा प्रशासनाकडून उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. सोबतच आरोग्य तपासणी तसेच त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर लहान मुलांसाठी दुधाची व्यवस्था या निवारागृहात केली आहे. कुरुंदवाड येथे कालपासून सुरू झालेल्या निवारागृहात तातडीने जेवण तसेच इतर आवश्यक सुविधा देण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी स्थानिक माध्यमांशी बोलताना मुश्रीफ म्हणाले, हिप्परगी आणि अलमट्टी या धरणामधून ३ लाख क्युसेक पेक्षा जास्त पाण्याचा विसर्ग सुरू आहे. कर्नाटक सरकारसोबत पाणी विसर्गाबाबत योग्य नियोजन सुरु आहे. याबाबत प्रशासन हे कर्नाटक सरकारशी संपर्कात आहे.

शिरोळ तहसील कार्यालयात स्थानिक प्रशासनाबरोबर पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पुरस्थितीबाबत आढावा घेतला. जिल्ह्यात आतापर्यंत ५ हजारापेक्षा जास्त कुटुबियांना स्थलांतरीत केले आहे. यावेळी सर्वांनी दक्ष राहून नागरिकांना आवश्यक मदत करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## हिपॅटायटीस सी साठी संभाव्य सब्यूनिट लस संश्र्लेषित करण्याची पद्धत या संभाव्य लस निर्मितीसाठी दयानंद विज्ञानच्या डॉ.राहुल मोरे यांना दक्षिण आफ्रिकेचे पेटंट



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे यांना हिपॅटायटीस सी साठी संभाव्य सब्यूनिट लस उमेदवार म्हणून ए१ ग्लायकोप्रोटीनवर योग्य टी–सेल एपिटोप्स ओळखण्याची आणि संश्र्लेषित करण्याची पद्धत या लस निर्मितीसाठी दक्षिण आफ्रिका या देशाचे पेटंट मिळाले आहे.सदरील पेटंट हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे येथील जैवतंत्रज्ञान व जैवमाहितीशास्त्र विभागातील विभाग प्रमुख व शास्त्रज्ञ यांच्या संयुक्त प्रयोगातून हिपॅटायटीस सी साठी संभाव्य सब्यूनिट लस उमेदवार म्हणून ए१ ग्लायकोप्रोटीनवर योग्य टी–सेल एपिटोप्स ओळखण्याची आणि संश्र्लेषित करण्याची पद्धत शोधण्यासाठी डॉ.राहुल अशोकराव मोरे यांच्यासमवेत पुणे विद्यापीठाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा.राजेश गच्चे यांनी अथक परिश्रम घेतले.

या पेटंटचे विश्र्लेषण असे की, हेपेटायटीस सी व्हायरस (एच. सि.वी.) संसर्गासाठी संभाव्य सब्यूनिट लस उमेदवार म्हणून इ –१ ग्लायकोप्रोटीनवरील योग्य टी–सेल एपिटोप्स ओळखण्यासाठी आणि संश्र्लेषित करण्याच्या पद्धतीवर चर्चा करते.हे तंत्र इ –१ ग्लायकोप्रोटीनवर योग्य टी–सेल एपिटोप्स शोधण्यासाठी वजाबाकी रिव्हर्स लसीकरण पद्धती वापरते.आण्विक डायनॅमिक्स (एम.डी.) सिम्युलेशनचा वापर एम.एच.सी. एपिटोप्स कॉम्प्लेक्सची संरचनात्मक आणि कार्यात्मक गतिशीलता समजून घेण्यासाठी आणि एम.एच.सी.प्रथिनाशी बांधील असताना ओळखलेल्या एपिटॉप्सच्या स्थिरतेची पुष्टी करण्यासाठी केला जातो.निवडलेल्या एपिटॉप्सची प्रायोगिकरित्या संश्र्लेषित केल्यानंतर विट्रोमध्ये चाचणी केली जाते.या नवोपक्रमाने हेपेटायटीस सी व्हायरस (एच.सि.वी.) संसर्गासाठी संभाव्य सब्यूनिट लस उमेदवार म्हणून QVRNSSGLY (P3) Am{U QLFTFSPRH (P7) हे दोन एपिटॉप्स ओळखले आहेत. हे एपिटोप्स भविष्यातील प्राणी आणि हिपॅटायटीस सी व्हायरस (एच.सि.वी.) संसर्गाविरूद्ध क्लिनिकल चाचणीसाठी महत्त्वपूर्ण आश्र्वासन दर्शवतात.

दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील संशोधन केंद्रातील उपलब्ध सोई– सुविधांचा या कार्यामध्ये उपयोग झाला असून या पेटंटबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे व सर्व विभागाचे विभागप्रमुख,प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# दोन पदकवीराना तीन पदकवीर जड !

### संपादकीय...

स्वंतत्र भारताच्या प्रारंभीच्या दोन, तिन दशकात भारताचे हित साधूनच पक्ष हित आणी सत्ताहित बघीतले जायचे. पण नंतरच्या काळात राजकीय स्वार्थातून राजकारणात मतभेद शिरले आणी सत्तेसाठी घासघिस सुरु झाली. त्यातून अनेक पक्ष, अनेक संघटना आणी त्यातून पक्षातंर्गत गट, तट अशी विभागणी होवून नेतृत्वाचे पाय ही घसरु लागले कोणी नेत्यासोबत तर कोणी कार्यकूशल कार्यकर्त्या बरोबर राहिल्याने पक्षातंर्गत गटबाजी, सघटनाचे विघटन होत गेले आजघडीला तर नेते, कार्यकर्ता, समाज हा एकत्र नाहीच. नेता कोण, कार्यकर्ता कोण आणी हे सारे कोणाच्या समाजाच्या, मतदाराच्या जिवावर की सर्वपक्षीय नेत्याच्या साम, दाम, दंड आणी फलनिष्ठाती यावरच आहे कांही समाजकारण, राजकारण, सत्ताकारण चालते आहे त्यात भारत देश, राज्य राज्यासह लोकहित मागे पडल्याचे चित्र दिसत असून देशाच्या विकासासाठी की अधोगतीसाठी राष्ट्रीयस्तरावर कोण विर आह`या बद्दलच देशपातळीवरील सत्ताधारी पक्षात ओढा ओढ सुरु असल्याचे दिसत असून दोन पदकवीराना आव्हाण देवून महाराष्ट्रातील तिन पदकविर अचानक लोकसभा अधिवेशनात कसे काय प्रकट झाले याविषयी उलटसूलट प्रतिक्रिया राजकीय जाणकारातून उमटताना दिसते आहे.

भारतीय नागरीकाना देशपातळीवर किंवा राज्यस्तरीय पातळीवर एकवीर, दोनवीर, तीन वीर अशी किती ही तिरवीराची उतरंड चढविली तरी त्यांचे जनतेला कांहीही देणे, घेणे नाही पंरतू केवळ भारताचा भौतीक सर्वकष भौतीक विकास व्हावा. नागरी समस्याचे निर्मूलन व्हावे, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराचे निर्मूलन करुन सुशिक्षीत बेकाराना शासकीय सेवेत सामावून,नियूक्ती प्रत्यक्ष अमलबजावणीने करावी. उद्योग, व्यवसायाचे, कारखानदारी, ते करण्यासाठीची करोडो रुपयाची तरतूद केली ही फसवी स्वप्ने नर दाखविता आजघडीला जे अपेक्षित आहे ते सर्वजाती, धर्मातील अपेक्षीत उपेक्षीत, निराधाना, बाराबलूते दाराना सोयीसुविधा द्याव्यात हीच अपेक्षा असताना भारत सरकारने अर्थात मोदीजीनी जो अर्थसंकल्प मांडला तो फसवा, दिशाभूल करणारा असल्याने त्याचे सर्व्हेक्षण, शोध आणी बोध घ्यावा लागेल अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे त्या अवास्तव कांहीही नसावे असे वाटते.

विशेष म्हणजे केंद्र सरकारचा, भारताच्या सर्वांगीण विकासाचा, सर्वसमावेश विभागाची प्रगती, रोजगार निर्मिती, उर्जा, शिक्षण, आरोग्य यातील अधोगती किंवा संरक्षण, अण्वस्त्र बांधकाम, पाटबंधारे, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाची प्रगती वगैरे ज्याकांही तरतूदी अर्थसंकल्पात आहेत त्या न्यायीक की, अन्यायीक असतील, नसतील पण देशभरात अर्थसंकल्पाचे दोनच पदकवीर म्हणजे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणी अर्थमंत्री निर्मला सितारामण हेच आहेत त्या दाव्यास प्रत्यूत्तर म्हणून संसदेत खा. तटकरे यानी केंद्र सरकार महाराष्ट्राच्या आर्थीक सहकार्यावरच चालते म्हणून अर्थसंकल्पाचे पदकवीर दोघे नसून शिंदे, फडणवीस, अजित पवार हेच तीन पदकवीर आहेत असा दावा तटकरेना केला मग काय ?

# पूरपरिस्थिती बिकट झाली तरी घाबरुन न जाता सर्व मिळून सामोरे जाऊ - पालकमंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर, : कोल्हापूर जिल्ह्यात आलेली अभूतपूर्व पुरपरिस्थिती लक्षात घेऊन पूरग्रस्तांचे पुनर्वसन जलदगतीने व्हावे ह्या उद्देशाने कोल्हापूर जिल्ह्यातील महापुरात देण्यात येणाऱ्या विविध मदतकार्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील विविध संघटना, व्यावसायिकांसोबत नियोजन बैठक पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतली. पूर निवारणासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारीला सुरूवात झाली असून घरांची पडझड, शेतीचे नुकसान तसेच इतर पुरग्रस्तांना पुरामुळे झालेला त्रास याबाबत प्रशासनाकडून पंचनामे करण्याचे आणि नागरिकांना मदत देण्याचे कार्य गतीने सुरू आहे.

ताराराणी सभागृहात झालेल्या बैठकीत पालकमंत्री मुश्रीफ यांनी सर्व उपस्थित संघटना, व्यावसायिकांना पुरस्थितीतून सावरण्यासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करू असे आवाहन केले. ते म्हणाले, पुरस्थिती बिकट झाली तरी जिल्हावासियांनी घाबरून न जाता सर्व मिळून त्याला सामोरे जावू. अलीकडील काळात दर दोन वर्षाला आपणाला या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. आपण यामध्ये आता अनुभवी झालो आहे. मात्र पुरग्रस्तांना चांगल्या प्रकारे मदत व्हावी, या उद्देशाने आपल्या मदतीने व प्रशासनामार्फत नियोजन केले जाईल. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, महानगरपालिका आयुक्त के.मंजूलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ आदी




उपस्थित होते.

मागील पुरस्थितीत क्रिडाईच्या पुढाकाराने कोल्हापूर डिझास्टर मॅनेजमेंट ग्रुपची स्थापना झाली असून कोल्हापुरातील मेडिकल असोसिएशन, पत्रकार संघ, हॉटेल मालक संघ, आयटी, व्हाईट आर्मी, अर्थ मुव्हींग यासह बहुतेक असोसिएशन, सोशल ग्रुप्स, एनजीओ, समाजसेवी संस्था, समाजसेवक एकाच व्यासपीठावर आले होते. तसेच आताही मदत कार्य व्हावे यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाच्या मदतीने पुरपश्र्चात मदतकार्याला सुरूवात केली आहे. शहरातील मदत कार्यात सुसूत्रता आणणे, पुरग्रस्तांसाठी जलदगतीने सहाय्य उपलब्ध करून देणे, जिल्हा प्रशासन–पोलीस व महानगरपालिका, जिल्हा परिषद आदी संस्थाना सहाय्य करणे, पूर ओसरल्यावर काय करावे व काय करू नये याचे प्रबोधन करणे, विविध स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये सुसूत्रता आणून त्यांची सेवा व माहिती गरजू पुरग्रस्त व नागरिकांपर्यंत पोहोचवणे व दानशूर व्यक्ती, ग्रुप्स, संस्थातर्फे येणारे धान्य,वस्तू, कपडे एकाच ठिकाणी गोळा करणे व वाटप करणे इत्यादी उद्देश या बैठकीत चर्चेला होते. यानुसार इच्छुक संघटनांची नियोजन बैठक रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्याचे यावेळी ठरले. महानगरपालिका आयुक्त के.मंजूलक्ष्मी यांनी शहरातील मदतीबद्दल माहिती दिली. त्या म्हणाल्या, कालपासून मोठ्या प्रमाणात दानशूर व्यक्ती मदत करीत आहेत. आता पूर ओसरत जाईल तसे स्वछता कामी आम्हाला मदत लागेल. याबाबत ज्यांना सहकार्य करायचे आहे त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी बैठकीचा उद्देश सांगून पुरस्थितीदरम्यान व पुरस्थिती पश्र्चात मोठ्या प्रमाणात प्रशासनाला सहकार्य लागते. तेच सहकार्य चांगल्या प्रकारे नियोजन करून सुत्रबद्ध केले तर चांगल्या प्रकारे नागरिकांना मदत देता येईल. चांगल्या समन्वयातून आवश्यक मदत योग्य ठिकाणी पोहचण्यासाठी प्रशासन एक केंद्र किंवा यंत्रणा उभारेल. तिथून मदतकार्याचे नियोजन करु. कोल्हापूर शहरासह शिरोळ तसेच हातकणंगले येथील पुरग्रस्तही समोर ठेवून मदतकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. जेवण, आरोग्य सुविधा, जनावरांना चारा यासह पशुंचे आरोग्य व पुरपश्र्चात सेवा यात स्वच्छता, किटकनाशक फवारणी आदी कामांचा समावेश आहे. यातून निश्र्चितच कमी वेळेत आपण पुरग्रस्त नागरिकांचे जीवनमान पुर्वपदावर आणू.

# कामगार कल्याण मंडळ आर्थिक तसेच सामाजिक विकासासाठी सतत प्रयत्नशील - आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित

नंदुरबार, : राज्य शासनाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ राज्यातील कामगारांच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासासाठी सतत प्रयत्नशील असते आणि त्यासाठी मंडळ वेळोवेळी विविध योजनांची सुरुवात करत असते. कामगारांनी आपल्यासाठी उपयुक्त अशा योजनेचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन शहादा येथे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले आहे.

ते शहादा व सारंगखेडा येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित अत्यावश्यक सुरक्षा संच व गृहपयोगी वस्तुंच्या वितरण प्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या कृषी सभापती हेमलता शितोळे, शेखर पाटील, शशिकांत पाटील, राजेंद्र गोसावी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री डॉ. गावित म्हणाले, राज्यातील बांधकाम क्षेत्रात काम करणारे कामगार हे आर्थिकदृष्ट्या गरीब असतात तसेच ते कमी वेतनात काम करत असतात त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असते व आर्थिक स्थिती गरीब असल्याकारणामुळे त्यांना त्यांचा विवाह करण्यासाठी लागणार खर्च परवडण्यासारखा नसतो व त्यामुळे त्यांना स्वतःचा विवाह करण्यासाठी लागणाऱ्या पैशांसाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच त्यांना विवाहासाठी आवश्यक पैशांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते तसेच त्यांना जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागते त्यामुळे राज्यातील कामगारांच्या या सर्व समस्यांचा विचार करून राज्य शासनाच्या कामगार विभागाने नोंदीत कामगाराच्या



पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आर्थिक दृष्ट्या गरीब कामगाराला पत्नीच्या प्रसूतीदरम्यान हॉस्पिटल चा खर्च करणे शक्य नसते व त्याला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे कामगार मंडळामार्फत कामगाराच्या पत्नीस नैसर्गिक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

यावेळी बोलताना ते म्हणाले, बहुतांश स्वतःचे उच्च शिक्षण परदेशात पूर्ण करण्यासाठी उत्सुक असतात परंतु बांधकाम क्षेत्र तसेच इतर क्षेत्रात काम करणारे कामगार हे आर्थिक दृष्ट्या गरीब असल्याकारणामुळे त्यांची मिळकत कमी असते आणि त्यामुळे ते आपल्या पाल्याना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्यासाठी असमर्थ असतात त्यामुळे विद्यार्थी परदेशात शिक्षण पूर्ण घेण्यापासून वंचित राहतात त्यामुळे कामगारांच्या या सर्व समस्यांचा विचार करून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने कामगारांच्या पाल्यांना परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती सुरु करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

ते पुढे म्हणाले, आपत्कालीन मदत: अपघात, आजार, मृत्यू इत्यादींमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानापासून संरक्षण, रुग्णालये, औषधे आणि आरोग्य विमा यांसारख्या आरोग्य सुविधा, कामगारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती आणि शिक्षण सहाय्य,कामगारांसाठी स्वस्त निवास सुविधा, निवृत्तीनंतर नियमित उत्पन्न, कर्ज, प्रशिक्षण, सामाजिक सुरक्षा इत्यादींसारख्या इतर सुविधा या मंडळामार्फत दिल्या जात असल्याचेही यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी यावेळी सांगितले.

सारंगखेडा येथील कार्यक्रमास हे होते उपस्थित..

पंचायत समितीचे उपसभापती सुनील पाटील, पंचायत समिती सदस्य विजय पाटील, उद्योजक शशिकांत पाटील, शेखर पाटील, दत्त मंदिर संस्थानचे उपाध्यक्ष रवींद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते विजय महाले, विकास सोसायटीचे उपाध्यक्ष शांतीलाल पाटील, राजेंद्र पाटील, देविदास माळी व गणेश पाटील.

# 'तेजोमय स्वरनाद' या कार्यक्रमाचे आज (२८ जुलै) आयोजन

मुंबई, : सांस्कृतिक कार्य विभाग, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी व हरिभाऊ विश्र्वनाथ म्युझिकल्स, प्रभादेवी आणि फोंडाघाट फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने तेजोमय स्वरनाद हा कार्यक्रम रविवार २८ जुलै, संध्याकाळी ६ वाजता करिश्मा हॉल, ५ वा मजला, रवींद्र नाट्यमंदिर आवार येथे आयोजित करण्यात आला आहे.

आषाढ महिना म्हटला, की सगळीकडे पडणारा पाऊस, हिरवी झालेली धरती, त्यामुळे प्रसन्न झालेले वातावरण असे चित्र असते. आषाढस्य प्रथम दिवसे असे म्हणत आपण त्याचे आनंदाने स्वागत करतो. विठ्ठलाच्या भेटीला निघालेले वारकरी आषाढी एकदशीला पांडुरंगाच्या पायाशी लीन होतात. याच महिन्यात येणारी गुरुपौर्णिमा गुरु आणि शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते. आषाढातला शेवटचा दिवस म्हणजे आषाढ अमावस्या किंवा दीप अमावस्या. या दीप अमावस्येचे सांस्कृतिक महत्त्व तेजोमय स्वरनाद कार्यक्रमातून उलगडले जाणार आहे.

इतिहासकालीन दिवे, त्यांचे वेगवेगळे उपयोग इ. रंजक माहिती आणि काही दुर्मीळ दिवे यावेळी बघायला मिळणार आहेत. दिव्यांचे संग्राहक आणि वक्ते मकरंद करंदीकर ही माहिती देणार असून निवेदिका दीपाली केळकर त्यांची मुलाखत घेतील. गायिका पद्मजा फेणाणी– जोगळेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असतील.

दिव्यांच्या अनुषंगाने येणारी विविध गाणी धनंजय म्हसकर, प्राची जोशी आणि श्रुती पोटे सादर करणार आहेत. वाद्य संगत हनुमंत रावडे, डॉ. हिमांशु गिंडे, वैभव कदम आणि तन्मय मेस्त्री यांची असेल. नृत्यांकुर डान्स अकादमीचे विद्यार्थी नृत्याविष्कार सादर करतील. कार्यक्रमाचे संयोजन प्रीती निनाद मांडके यांचे आहे. हा कार्यक्रम रसिकांसाठी खुला आहे.

**लोकशाही ..**

कुणी बोला काहीही
इथेनांदते लोकशाही
नकाबसू उपोषणास
पोलिसांचीठोकशाही
शिळ्याकढीला ऊत
डोक्याची करतीदही
बोकाळले बेबंदवक्ते
मोकळ्या दिशादाही
जिव्हा हत्यार चालते
समाजा माजवा दुही
चार बोटे दुसरीकडे
उन्मत्तवागणारं मीही
पत्रकार काय करेलं
वाळली पेनाची शाई
अंगावर फेकणेसाठी
अधिक वापरता शाई
मुक्त हस्ते गोळीबार
मुळी अडवणारं नाही
जामीन सहज सुलभ
निश्र्चित निश्र्चित राही
विरोधक न् सत्ताधारी
रे आपलेचं हीत पाही
सामान्य होरपळलेला
थंडीत अंगाची लाही

२

**मन सफाई ..**

आली रे घंटा गाडी
फिरवित दारोदारी
नांदू लागे स्वच्छता
सुखेनेव रे घरो घरी
महत्व ते सफाईचे
पटू लागे खरोखरी
विरोध ही मावळला
सत्य बोलते वैखरी
पटले जरा उशीराने
प्रयास होई परोपरी
श्रेयभले घ्यावयाला
मंडळी आली उपरी
सफाई नांदते जिथे
वास करे लक्ष्मी हरी
कार्य चालो निरंतरी
ध्यानठेवा आतातरी
आता सफाईमनाची
रूजो विचार अंतरी
पहा प्रयोग करुन हा
आनंद जाय दिगंतरी
अंत: बाह्य शुचिर्भूती
जन्म अखिल उध्दरी
अस्वच्छता दूर राहो
कासपावित्र्याची धरी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना मिळणार अधिक दर्जेदार, तंत्रकुशल आणि रोजगारक्षम शिक्षण प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई

लातूर : वैश्र्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून विद्यार्थ्याकरिता अधिक दर्जेदार, तंत्र कुशल आणि रोजगारक्षम शिक्षण प्राप्त होईल असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.



महाविद्यालयाच्यावतीने आयोजित विद्यार्थी संवाद मेळाव्यात ते अध्यक्षिय समारोप करतांना बोलत होते.

यावेळी विचारपीठावर एन.ए.पी समन्वयक डॉ. दिपक चाटे, कला शाखा समन्वयक डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी आणि पदव्युत्तर शाखा समन्वयक डॉ. यशवंत वळवी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाला.

पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांचे क्षमता शोधन, आणि विकसन करणारे बहुविद्याशाखीय, बहुभाषिक समग्र शिक्षणाचा विकास करणारे उत्कृष्ट दर्जाचे, कालसापेक्ष असे शैक्षणिक धोरण आहे. असेही ते म्हणाले.

यावेळी प्रास्ताविक करतांना डॉ. दिपक चाटे म्हणाले की, जागतिक दर्जाचे विद्यापीठ आणि महाविद्यालय तयार करण्यासाठी या धोरणात अमुलाग्र असा बदल करण्यात आला आहे. परिवर्तनशील , लवचिक, मुक्त शिक्षण प्रणालीचा वापर करणारे विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांच्यातील, कौशल्याचे विकसन करणारे, सकारात्मक असे शिक्षण आहे. असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विजयकुमार सोनी म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आंतरविद्याशाखीय विषयांची निवड ही महत्त्वपूर्ण असे प्रक्रिया आहे. जनरल इलेक्टिव्ह या विषयात शाखा बाह्य विषयाची निवड करावयाची असून या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तर होणारच आहे पण विद्यार्थी अधिक बहुभाषिक अष्टपैलू, भविष्यात येणाऱ्या आव्हानांना समर्थपणे पेलणारा आणि भारताच्या शाश्र्वत विकासात भरीव कामगिरी तयार करणारा तयार होणार आहे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर उपस्थित त्यांचे आभार डॉ.कॅप्टन बाळासाहेब गोडबोले यांनी मानले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ. राहुल डोंबे, प्रा. आशिष स्वामी, राम पाटील, संतोष येचेंवाड, बालाजी डावकरे, संदीप मोरे आदींनी परिश्रम घेतले.

# मांजरा शुगर (कंचेश्र्वर) येथे मील रोलर पुजन व वृक्षारोपण संपन्न

लातूर,धाराशिवसह राज्यात आणि देशभरात सहकार महर्षी मा.दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे लौकिक प्राप्त केलेल्या व नुकताच मांजरा परिवारात समाविष्ट झालेल्या मांजरा शुगर (कंचेश्र्वर) कारखान्यात २०२४-२५ हंगाम सुरू होण्याच्या दृष्टीने मील रोलरचे पुजन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख,आ.धिरज विलासराव देशमुख व रीड लातूर उपक्रमाच्या संस्थापक सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख, वंश देशमुख,दिवीयाना देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. यासोबतच कारखाना परिसरात वृक्षारोपण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जागृती शुगरचे व्हा. चेअरमन लक्ष्मणराव मोरे,रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, दिपक जवळगेकर, मुकुंद डोंगरे, धिरज पाटील, विनोद पाटील,



माजी जि.प.अध्यक्ष संतोष देशमुख, रेणाचे व्हा चेअरमन अनंतराव देशमुख,जिल्हा बँक संचालक राजकुमार पाटील,अनुप शेळके,संभाजी रेड्डी,मांजरा कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडीत देसाई, जागृतीचे व्यवस्थापक गणेश येवले, जिल्हा बँक कार्यकारी संचालक एच जे जाधव,मांजरा शुगरचे जनरल मॅनेजर सतिश वाकडे, जनरल मॅनेजर फिल्ड अँड कृषी अधिकारी रामानंद कदम,टेक. जनरल मॅनेजर अजित कदम, चिफ केमिस्ट,बाळासाहेब पेठे, मुख्य शेतकी अधिकारी नारायण धांडे,डिस्टलरी मॅनेजर उत्तम -हायकर, कार्यालयीन अधिकारी अभय तिवारी,सिव्हील इंजिनीअर,गोकुळ थावरे,परचेस ऑफीसर संतोष जाधव आदींची उपस्थिती होती.

मागील गळीत हंगामात कारखान्याने गाळपास आलेल्या ऊसाला १० दिवसात संपूर्ण एफआरपीचे एकरकमी ऊस बील देवून शेतकरी बांधवांच्या मनात विश्र्वास निर्माण केला असल्याने गळीत-हंगाम २०२४-२५ मध्ये आपला ऊस गाळपासाठी मांजरा शुगर (कंचेश्र्वर) कडे देणार असल्याचा निर्धार ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केला असल्याचे दिसून येत आहे.

# श्रीक्षेत्र निळकंठेश्र्वर देवस्थान विकासासाठी पाच कोटी रुपयाचा निधी मिळवून देणार भाजपाचे नेते आ.रमेशआप्पा कराड यांची ग्वाही

**लातूर - असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्र्वर या देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'ब' दर्जा प्राप्त झाला असून या मंदिराच्या सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांच्या सोयी सुविधेचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करा निश्र्चितपणे पाच कोटी रुपयांचा निधी राज्यातील महायुती शासनाकडून मिळवून देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.**

लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्र्वर देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'ब' दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा श्री निळकंठेश्र्वर देवस्थान आणि निळकंठ, पिंपळगाव, आंबा, मसला, भोसा, तांदूळजा यासह विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने लातूर येथे भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, निळकंठ येथील श्री निळकंठेश्र्वर हे जागृत देवस्थान असून या मंदिर परिसरात येणाऱ्या भाविक भक्तासह प्रत्येकास प्रसन्नता मिळते. भाविकांची वाढती संख्या पाहता या मंदिर परिसराचा विकास व्हावा येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी अधिकचा निधी आवश्यक असल्याने या मंदिराचा राज्य शासन ग्रामविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा




स्थळ, तीर्थक्षेत्र विकास योजनेचा 'ब' दर्जा मिळवून दिला आहे. यामुळे मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही. तेव्हा मंदिर ट्रस्ट आणि त्या परिसरातील नागरिकांनी सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांना सोईसुविधा मिळाव्यात असा परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करावा या प्रस्तावास मान्यता मिळवून देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

निळकंठ आणि परिसरातील नागरिकांनी मंदिराच्या विकासाचा एकीने निर्णय घेतला. ही आनंदाची बाब असून आपण सर्वजण मिळून चांगला विकास घडून आणू. श्रद्धेचे स्थान, मंदिराचे वैभव आणि उंची टिकविण्याचे काम करू या. राज्य शासनाकडून या मंदिर परिसराच्या विकासासाठी निश्र्चितपणे किमान पाच कोटी रुपयांचा निधी मिळून देऊ असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मंदिर परिसरात होणारी विकास कामे दर्जेदार व्हावीत, पिढ्यान पिढ्या टिकणारी कामे झाली पाहिजे अशी सूचना केली.

लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्र्वर देवस्थान येथे स्वयंभू शिव व शक्ती अशा दोन पिंड विराजमान आहेत. हे खूप दुर्मिळ आहे. या देवस्थानास सातत्याने असंख्य भाविकभक्त श्रद्धेने येत असतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेवून येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत श्रीक्षेत्र निळकंठेश्र्वर देवस्थानाला 'ब' दर्जा मिळवून दिला. सदरील ब दर्जा प्राप्त झाल्याने मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद होऊन भाविकांसाठी विविध सोयी सुविधा बरोबरच या मंदिर परिसरचा सर्वांगीण विकास होणार आहे. देवस्थानास 'ब' दर्जा मिळून दिल्याबद्दल आ रमेशआप्पा कराड साहेब यांचे श्री निळकंठेश्र्वर देवस्थानचे पदाधिकारी आणि त्या परिसरातील विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, श्रीनिळकंठेश्र्वर देवस्थानचे अध्यक्ष शिवदत्त औताडे, भुजंग औताडे, गणेश पुरी, किरण शिंदे, शालीक औताडे, शिवाजी आंबेकर, चेअरमन चंद्रकांत वागस्कर, प्रभू औताडे, श्यामसुंदर वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, बापूराव बिडवे, अशोक सावंत, कमलाकर भुसारे, महेश आताडे, अच्युत पिसाळ, हनुमंत औताडे, मधुकर बिडवे, रामभाऊ पिसाळ, सुभाष पिसाळ, तानाजी ढोबळे, महादेव बिडवे, बापुराव बिडवे, मेघराज पिसाळ, विजय पिसाळ, युवराज औताडे, अच्युत पिसाळ, सुखदेव कुकर, रामेश्र्वर पाटील, वामन बिडवे, मधुकर बिडवे, मुन्ना पिसाळ, अभिषेक बिडवे, अर्जुन वाघमारे, रामभाऊ पिसाळ, औदुंबर पवार, यांच्यासह पिंपळगाव आंबा, निळकंठ, भोसा, मसला, तांदूळजा या विविध गावातील नागरिक, भाविक भक्त आणि भाजपाचे लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर शिष्टमंडळाने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची घेतली भेट, ध्वजारोहण सोहळ्याचे दिले निमंत्रण

लातुर प्रतिनिधी : साहीत्यसम्राट अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर - २०२४ शिष्टमंडळाने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण सोहळ्याचे त्यांना निमंत्रण देऊन



विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष राज क्षीरसागर, गोरोबा लोखंडे, मोहन सुरवसे, संभाजी मस्के, वर्षा मस्के, केशरबाई महापुरे, मनीषा पुंड, सचिन कांबळे, विश्र्वजीत गव्हाणे, पिराजी साठे, आनंद वैरागे, जेष्ठ पत्रकार अशोक देडे, नाना कांबळे, मंगेश वैरागे, सुनील बसपुरे, ॲड. अंगद गायकवाड, जी.ए गायकवाड, सिताराम पवार आदी उपस्थित होते.

## आयएमए - मिशन पिंक हेल्थच्या वतीने शारदा इंटरनॅशनल शाळेत मार्गदर्शन

लातूर : लातूर आयएमएच्या मिशन पिंक हेल्थ शाखेद्वारे



शारदा इंटरनॅशनल शाळेच्या किशोरवयीन मुला - मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उदघाटन आयएमए, लातूरचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे,मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्ष डॉ.वृंदा कुलकर्णी, सचिव डॉ. रचना जाजू , सदस्य डॉ.विद्या कांदे,सदस्य डॉ. आशिष चेपूरे, सदस्य डॉ.अर्जुन मंदाडे यांच्या उपस्थितीत झाले.

डॉ.उमेश कानडेंनी प्रास्ताविक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. कानडे यांनी किशोरवयीन मुला - मुलींच्या आरोग्य विषयक समस्यांविषयी सोप्या शब्दात माहिती दिली.डॉ.वृंदा कुलकर्णी यांनी मिशन पिंक हेल्थच्या कार्याचे स्वरूप सांगितले. डॉ. रचना जाजू यांनी मुलींना मासिक पाळी व पाळीत घ्यावयाची काळजी, स्वच्छता याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. विद्या कांदे यांनी रक्तक्षय ,आहार व भावनिक बुद्ध्यांक याबाबत माहिती दिली.

डॉ.वृंदा कुलकर्णी यांनी सोशल मीडिया व्यसन याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. अर्जुन मंदाडे यांनी किशोरवयीन मुलांमध्ये होणारे शारीरिक बदल यासंबंधी माहिती दिली. तर डॉ. आशिष चेपूरे यांनी व्यसनाधीन न होण्यासाठी मुलांना शपथ ग्रहण करायला लावली तसेच मुलांना सोशल मीडिया व्यसना संबंधी पण मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या मनातील सर्व शंकांचे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून निरसन करण्यात आले.

मिशन पिंक हेल्थच्या अध्यक्ष डॉ.वृंदा कुलकर्णी ,सचिव डॉ. रचना जाजू आणि सदस्य डॉ. विद्या कांदे,डॉ. आशिष चेपूरे,डॉ. अर्जून मंदाडे यांनी शारदा इंटरनॅशनल शाळेतील सहावी ते दहावीच्या साडेपाचशेपेक्षा जास्त मुलामुलींना याप्रसंगी मार्गदर्शन केले.संस्थेचे उपाध्यक्ष पाटील, उपमुख्याध्यापक सौ. शेळके व शिक्षक गायकवाड यांनी या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना अत्यंत आवश्यक अशी माहिती दिल्याबद्दल व योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल आयएमएच्या सर्व पदाधिकारी व डॉक्टर्सचे आभार मानले.

## एम.एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी (डिग्री)/पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन शिबिर

लातुर : या वर्षासाठीची अभियांत्रिकी पदवी व पदविका प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षीच या प्रवेश प्रक्रियेबद्दल विस्तृत माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले जाते. यावर्षी हे शिबिर रविवार दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पदवी (डिग्री) तर दुपारी १ वाजता पदविका (डिप्लोमा) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले आहे.

मागील काही वर्षांपासून ही संपूर्ण प्रक्रिया औनलाइन पध्दतीने पार पाडली जाते. त्यामुळे ही प्रक्रिया यशस्वीपणे पार करताना विद्यार्थ्यांना बरयाच अडचणी येऊ शकतात. तसेच योग्य माहिती अभावी चांगले मार्क्स असुन सुद्धा हवे ते महाविद्यालय व हव्या त्या विद्याशाखेची निवड करताना चुकल्यास खुप मोठे नुकसान होऊ शकते.

बिडवे अभियांत्रिकीच्या तज्ञ व अनुभवी प्राध्यापकाची टीम यावेळी सखोल व विस्तृत मार्गदर्शन करनार आहे. पदवी (डिग्री) प्रवेशच्छुक विद्यार्थ्यांनी सकाळी ११ वाजता तसेच पदविका (डिप्लोमा) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दुपारी ठिक १ वाजता महाविद्यालयाच्या फंक्शन हॉलमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहुन या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. सुरेश हल्लाळी यांनी केले आहे. तसेच महाविद्यालयात औप्शन फौर्म भरण्याची मोफत सुविधाही उपलब्ध आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे महाविद्यालयाच्या प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर तर्फे चांडेश्र्वर येथे वृक्षारोपण शिबीर सपन्न

(लातूर ) : लातूर येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद



कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे २७ जुलै २०२४ रोजी चांडेश्र्वर येथे वृक्षारोपण शिबीर संपन्न झाले. सामाजिक जाणिव लक्षात घेवून राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालया तर्फे प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या मार्गदर्शना खाली रा.से.यो.वि.चे प्रमुख प्रा.वाघमारे राहुल व चांडेश्र्वर चे सरपंच चंद्रकांत नलावडे ग्रामस्थ नागरिक व रा.से.यो.चे विद्यार्थी यांच्या सहकार्याने वृक्षवाढी करिता असलेलं उपयुक्त वातावरण लक्षात घेत वृक्षारोपण शिबीर उत्साहात संपन्न झाले. या वृक्षारोपण शिबीरा चे उद्घाटन सरपंच चंद्रकांत नलावडे व रा.से.यो.चे प्रमुख प्रा.वाघमारे आर. एस. यांच्या हस्ते झाले. या वेळी महाविद्यायातील प्राध्यापकवृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो.विभागाचे विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी बांबू, चिंच, अंबा, नीलगिरी, आवळा, कडुनींब, रिठा, बोर,अशा उपयुक्त वृक्षांचे साधारणतः १०१ वृक्ष रोपांचे सर्वांच्या सहकार्याने वृक्षारोपण चांडेश्र्वर येथे करण्यात आले.या वृक्षा रोपण शिबिरास आर्ट ऑफ लिव्हिंग,बाभळगाव यांनी ५० रोपटे उपलब्ध करून दिली.

महाविद्यालयाच्या या उपयुक्त उपक्रमा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे,ललितकुमारजी शहा, रमेशजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजयजी बोरा यांनी अभिनंदन केले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894